## दि. २०-०२-२०२१ रोजी IQAC सभेत पारीत झालेले ठराव.

भगिनी मंडळ, चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील IQAC समितीची सभा दिनांक २०-०२-२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. प्राचार्य डॉ. ईश्वर एम. सौंदाणकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत खालील ठराव मंजूर करण्यात आले.

**विषय क्र. १** मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्यास कायम मंजूरी देणे.

**ठराव क्र. १** IQAC समितीची दिनांक २५-०६-२०२० रोजी झालेल्या सभेतील सर्व विषयांचे इतिवृत्त सभेसमोर वाचून दाखविण्यात आले व एकमताने या सभेने सर्व ठरावांना कायम मंजूरी दिली.

**सूचक :** प्रा. आशिष एस. गुजराथी

**अनुमोदक :** डॉ. राहुल वाय. निकम

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. २** मागील सभेत घेतलेल्या निर्णयाच्या कृतीयुक्त अहवालाचे सभेसमोर वाचन करून त्यास अंतिम मंजूरी देणे.

**ठराव क्र. २** २५-०६-२०२० रोजी झालेल्या IQAC समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपक्रमामध्ये कोरोनामुळे समाजावर झालेल्या परीणाम त्याबाबत जनजागृती करणे, क्षेत्रकार्याच्या ठिकाणी कोरोना बाबत माहिती देणे तसेच पाणी अडवा-पाणी जिरवा उपक्रम, छतावरील पाणी अडवणे व जिरवणे, वाढदिवसानिमित्त ग्रंथालय पुस्तिका भेट उपक्रम, **AQAR** तयार करणे, आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करणे, डेंग्यु मलेरिया, आपतकालीन व्यवस्थापन यासारख्या विषयांवर सहयोगी संस्थांच्या सहकार्याने कार्यशाळेचे आयोजन करणे इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करणे, रिफ्रेशर आणि ओरिएंटेशन कोर्ससाठी प्राध्यापकांना संधी उपलब्ध करून देणे, इ. राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा कृतीयुक्त आराखडा सभेसमोर वाचून दाखविण्यात येवून त्यास सभेने एकमताने मंजुरी दिली.

**सूचक :** डॉ. मारोती एन. गायकवाड

**अनुमोदक :** प्रा. आशिष एस. गुजराथी

**विषय क्र. ३** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील द्वितीय सत्रामधील कार्याचे नियोजन करणे.

**ठराव क्र. ३** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील द्वितीय सत्रात असणाऱ्या विविध उपक्रमांसंदर्भात सभेत सविस्तर चर्चा करण्यात येवून बी.एस.डब्ल्यु. प्रथम वर्ष आणि एम.एस.डब्ल्यु. प्रथम वर्ष या वर्गाचे ग्रामीण शिबीर कोव्हीड-१९ मुळे ग्रामिण शिबीर घेवू नये असे ठरले तसेच एम.एस.डब्ल्यु. द्वितीय वर्ष व बी.एस.डब्ल्यु. द्वितीय वर्ष या वर्गाची शैक्षणिक सहल, परमपूज्य बाबाजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा, स्वयंसिद्धा व युवतीसभा, यासारखे उपक्रम कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय व विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयात उपक्रम घेवू नये परंतू क्षेत्रकार्यातील संस्थाभेटी ऑनलाईन घेण्यात याव्यात तसेच विविध विषयावर वेबीनार आयोजीत करण्यात यावे असे या सभेत सर्वानुमते

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

ठरविण्यात

**सूचक :** डॉ. विनोद ए. रायपुरे

**अनुमोदक :** डॉ. विष्णू आर. गुंजाळ

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ४** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील द्वितीय सत्रासाठीच्या विषयांचे शिक्षकनिहाय वाटप करणे.

**ठराव क्र. ४** शैक्षणिक वर्ष २०२०-२० मधील द्वितीय सत्रात असणाऱ्या विविध बी.एस.डब्ल्यु. आणि एम.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रमाच्या विषयांचे वाटप करणेसंदर्भात सदरहु सभेत चर्चा करण्यात आली व शिक्षकनिहाय पुढील विषय संबंधीत शिक्षकाला शिकविण्यासाठी देण्याचे एकमताने मंजूर करण्यात आले.

| शिक्षकाचे नाव | वर्ग | विषय |
|---|---|---|
| डॉ. अनंत व्ही. देशमुख | MSW-I | Women Centered Social Work, |
| | MSW-II | Participatory Approach In Community Development |
| डॉ. विष्णु आर. गुंजाळ | MSW-II | Social Justice |
| | TYBSW | Life and Soft Skill Education in Social Work |
| प्रा. आशिष एस. गुजराथी | FYBSW | Rural Community |
| | FYBSW | Environment |
| | MSW-I | Urban, Rural & Tribal Communities |
| डॉ. विनोद ए. रायपुरे | MSW-I | Counseling In Social Work |
| | MSW-II | Social Policy Planning and Administration |
| | TYBSW | Social Policy In India |
| प्रा. ज्ञानेश्वर जी. भागवत | MSW-I | Problems of Urban, Rural and Tribal Communities |
| | TYBSW | Communication for Development |
| | MSW-II | Education for Social Development |
| प्रा. नारसिंग डी. वळवी | MSW-II | Municipal Administration |
| | FYBSW | Indian Social Problems |

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

**Principal**
**Bhagini Mandal Chopda Sanchalit**
**College of Social Work, Chopda**

| | | |
|---|---|---|
| प्रा. शैलेश बी. पाटील | FYBSW | Emerging Trends In Social Work |
| | SYBSW | Introduction to Tribal Life |
| | TYBSW | Health System In India |
| डॉ. संबोधी एम. देशपांडे | MSW-I | Family and Child Welfare |
| | MSW-II | Social Security and Labour Welfare |
| | SYBSW | Introduction to Local Self Government |
| डॉ. उत्तम जे. सोनकांबळे | MSW-II | Corporate Social Responsibility |
| | MSW-I | Social Work Research and Stat |
| | SYBSW | Introduction to Social Work Research |
| डॉ. राहुल वाय. निकम | FYBSW | Human Rights |
| | SYBSW | India |
| | MSW-II | Health System In India |
| डॉ. मारोती एन. गायकवाड | MSW-I | Introduction to Indian Constitution |
| | FYBSW | Working With Group |
| | MSW-I | Institutional Management |
| डॉ. मोहिनी यु. उपासनी | FYBSW | Human Growth and Behavior |
| | SYBSW | Introduction to Woman Studies |
| | TYBSW | Development of Weaker Section |

**सूचक :** डॉ. विनोद ए. रायपुरे

**अनुमोदक :** प्रा. नारसिंग डी. वळवी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ५** फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामला पाठविण्यासाठीचा निकष निर्धारीत करणे तसेच रिफ्रेशर/ओरीएन्टेशन/शॉर्ट टर्मला जाण्यासंदर्भात अर्जदार प्राध्यापकांना मंजूरी देणे.

**ठराव क्र. ५** सदरहू विषयावर सभेत सविस्तर चर्चा होऊन द्वितीय सत्रातील विविध उपक्रम, संभाव्य नॅकची कामे तसेच अभ्यासक्रम यांची आवश्यकता लक्षात घेता द्वितीय सत्रात प्राध्यापकांनी रिफ्रेशर/ओरीएन्टेशन/शॉर्ट टर्मला जाण्यासंदर्भात परवानगी मागू नये व त्याची अतिशय आवश्यकता असल्यास तो सुटीच्या कालावधीत करावा असे चर्चिले गेले. या सभेपर्यंत कोणत्याही प्राध्यापकाची रिफ्रेशर/ओरीएन्टेशन/शॉर्ट टर्मला जाण्यासंदर्भातील अर्ज IQAC कडे प्राप्त झालेले नाहीत.

**सूचक :** डॉ. अनंत व्ही देशमुख

**अनुमोदक :** डॉ. विनोद ए. रायपुरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

BMC's, College of Social Work, Chopda IQAC

**विषय क्र. ६** शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा AQAR रिपोर्ट पाठविणेसाठी आवश्यक असणाऱ्या विविध प्रारूपे तयार करणे.

**ठराव क्र. ६** सदरहु सभेत २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा AQAR रिपोर्ट तयार करणेसाठी Excel, Word आणि PDF या प्रकारच्या Criteria प्रमाणे फाईल्स तयार करण्यासाठी आवश्यक असणारी प्रारूपे या सभेत तयार करण्यात आली असून त्यास सभेने सर्वानुमते मंजूरी दिली.

**सूचक :** डॉ. विनोद ए. रायपुरे

**अनुमोदक :** डॉ. मारूती एन. गायकवाड

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ७** महाविद्यालयातील विविध समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेणे.

**ठराव क्र. ७** महाविद्यालय व विद्यार्थी विकासासाठी महाविद्यालयीन स्तरावर गठीत विविध समित्यांमार्फत अनेकविध उपक्रम शैक्षणिक वर्षात राबविले जातात. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथम सत्रात विविध समित्यांनी राबविलेल्या उपक्रमांची, त्यांच्या अहवालांची छाननी IQAC समितीने करून त्यास मंजुरी देण्यात आली.

**सूचक :** प्रा. कल्पना एस. सोनवणे

**अनुमोदक :** डॉ. मारूती एन. गायकवाड

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ८** महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघ नोंदणीकृत करणे संदर्भात चर्चा करणे.

**ठराव क्र. ८** महाविद्यालयात २०१४-१५ पासून माजी विद्यार्थी संघ अस्तित्वात असून त्या माध्यमातून आवश्यक ते उपक्रम आयोजित केले जातात. परंतु हा विद्यार्थी संघ नोंदणीकृत असावा या दृष्टीने सदरहु सभेत सविस्तर चर्चा होऊन माजी विद्यार्थी नोंदणीकृत करण्या संदर्भातील जबाबदारी प्रा. आशिष एस. गुजराथी व प्रा. शैलेश बी. पाटील यांच्याकडे सोपविण्यात यावे असे सभेत एकमताने ठरविण्यात आले.

**सूचक :** प्रा. नारसिंग डी. वळवी

**अनुमोदक :** श्री. आशिष ए. गुजराथी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ९** शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ चा अंतिम AQAR मसूदा महाविद्यालय विकास समितीच्या मान्यतेसाठी सादर करणेबाबत.

**ठराव क्र. ९** महाविद्यालयाच्या प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विविध Criteria च्या अनुषंगाने तयार केलेला शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ चा अंतिम AQAR मसूदा नॅककडे सादर करण्यापूर्वी अंतिम मंजूरीसाठी महाविद्यालय विकास समितीकडे पाठविण्यात यावा व त्यांच्या अंतिम मंजूरी नंतरच नॅककडे

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

ऑनलाईन सादर करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**सूचक :** प्रा. आशिष एस. गुजराथी

**अनुमोदक :** प्रा. नारसिंग डी. वळवी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

मा. अध्यक्षांनी सभेपुढे कुठलेही विषय नसल्याने सभा संपल्याचे जाहिर केले.

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

BMC's, College of Social Work, Chopda
IQAC